आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१६ सप्टेंबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे राज्य निवडणूक आयोगाला निर्देश

- राज्याच्या AVGC धोरणाला मंत्रिमंडळाची मान्यता, ५० हजार कोटींची गुंतवणूक आणि २ लाख नवीन रोजगार निर्मितीची आशा

- मागासवर्गीय शासकीय वसतीगृहातल्या विद्यार्थ्यांचा दैनंदिन निर्वाह भत्ता आणि विद्यार्थिनींच्या स्वच्छता-प्रसाधन भत्त्यात दुपटीनं वाढ

- ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीनं सुमारे १८ लाख हेक्टरवरच्या पिकांचं नुकसान

**आणि**

- तुळजाभवानी देवीचा शारदीय नवरात्र आणि कोल्हापूरचा शाही दसरा आता राज्याचा प्रमुख महोत्सव

**<><><><>**

राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज राज्य निवडणूक आयोगाला दिले. यापुढे यासाठी आणखी मुदतवाढ दिली जाणार नाही, असंही न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं स्पष्ट केलं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**-- होल्ड निवडणूक व्हाइस कास्ट- - -**

*(स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं ६ मे रोजी ठरवून दिलेली चार महिन्यांची कालमर्यादा न पाळल्याबद्दल न्यायालयानं आज राज्य निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले. प्रभाग पुनर्रचनेची प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी. निवडणुकीसाठी लागणाऱ्या मनुष्यबळाचे तपशील दोन आठवड्यांच्या आत राज्याच्या मुख्य सचिवांकडे सादर करावेत, तसंच ईव्हीएम्सची कमतरता दूर करून*

*त्याबाबतचं कार्यपूर्ती शपथपत्र ३० नोव्हेंबरपर्यंत सादर करावं, असे निर्देशही न्यायालयानं आयोगाला दिले.*

*दरम्यान, या निवडणुका कधीही झाल्या, तरी महायुती सज्ज असून या निवडणुकीत महायुतीला यश मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला.*

- ***- होल्ड... बाईट- एकनाथ शिंदे- - )***

- **<><><><>**

महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी धोरण २०२५ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जाहीर करण्यात आलं. या धोरणात सन २०५० पर्यंतचं नियोजन असून सुमारे ३ हजार २६८ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. या माध्यमातून राज्यात ५० हजार कोटींची गुंतवणूक येणार असून २ लाख नवीन रोजगार निर्माण होणार आहेत. कर्नाटक, तेलंगणा, राजस्थान, केरळ आणि मध्य प्रदेशात या प्रकारचे धोरण तयार आहे. राज्य मंत्रीमंडळानं घेतलेल्या इतर निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

- **- होल्ड व्हाइस कास्ट मंत्रीमंडळ - -**

*(मागासवर्गीय शासकीय वसतीगृहातल्या विद्यार्थ्यांचा दैनंदिन निर्वाह भत्ता आणि विद्यार्थिनींच्या स्वच्छता-प्रसाधन भत्त्यात दुपटीनं वाढ करायला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. राज्यातल्या ४४३ वसतीगृहांमध्ये सुमारे ४४ हजार विद्यार्थी राहण्याची क्षमता आहे. याठिकाणी १ सप्टेंबरपासून हे नवीन भत्ते लागू होणार आहे.*

*राज्याच्या पायाभूत सुविधा उपसमितीला मंत्रिमंडळ समितीचा दर्जा देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यापुढे ही उपसमिती, मंत्रिमंडळ समिती म्हणून काम करेल.*

*राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेला पुढच्या दोन वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली. राज्यभरात ११६ बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी आणि असलेल्या भवनांच्या दुरुस्तीसाठी एकंदर १३२ कोटी ४८ लाखांचा खर्च येणार आहे. तसंच विविध ठिकाणी ७९ नवीन शेतकरी भवनं उभारण्याचे प्रस्ताव आहेत.*

*भंडारा ते गडचिरोली यादरम्यान ९४ किलोमीटरचा प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार असून याची आखणी आणि भूसंपादनाला, तसंच अनुषांगिक ९३१ कोटी १५ लाख रुपयांच्या खर्चाला मंत्रिमंडळानं मान्यता दिली.  नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी महानिर्मिती आणि सतलज जलविद्युत निगम मर्यादित यांची संयुक्त उद्यम कंपनी स्थापन करायलाही मंत्रिमंडळानं आज हिरवा कंदील दाखवला.)*

**<><><><>**

बोगस जात प्रमाणपत्रांना आळा घालण्यासाठी कागदपत्रांची सखोल पडताळणी करण्याचे निर्देश ओबीसीच्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईत झालेल्या बैठकीत दिले.

ओबीसी समाजाच्या विविध योजनांसाठी थकीत असलेला २ हजार ९३३ कोटी रुपयांचा निधी १५ दिवसांच्या आत देण्याच्या सूचना दिल्या. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमधील त्रुटी दूर करून थकीत रक्कम लवकरच दिली जाईल, असं आश्वासन बावनकुळे यांनी बैठकीत दिलं. राज्यातल्या ३६ जिल्ह्यांमध्ये वसतिगृहे उभारण्याच्या काम लवकर पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी १६ जिल्ह्यांमध्ये जागेची आवश्यकता असून, भूसंपादनासाठी स्वतंत्र एजन्सी नेमण्याचा प्रस्तावही विचाराधीन असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे ३० जिल्ह्यातल्या १९५ तालुक्यांमध्ये मोठं नुकसान झालं आहे. एकूण १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याची आणि ६५४ महसूल मंडळातल्या खरीप पिकांंना मोठा फटका बसल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. यात सर्वाधिक नुकसान नांदेड जिल्ह्यात झालं आहे, त्याखालोखाल यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यांना फटका बसला आहे. ऑगस्ट महिन्यातल्या अतिवृष्टीनंतर काही जिल्ह्यांतले पंचनामे पूर्ण होऊन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात आली आहे. उर्वरित क्षेत्रांच्या पंचनाम्याचं काम युद्धपातळीवर सुरू असल्याचंही भरणे यांनी सांगितलं.

**<><><><>**

जीएसटी परिषदेनं अनेक वस्तूंवरचा कर कमी केला आहे. त्यामुळं शेतीसाठी लागणाऱ्या अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत. ऐकूया त्याविषयी अधिक माहिती...

**-- होल्ड- व्हॉईस कास्ट- - -**

*(ट्रॅक्टर्स, कापणी यंत्र, आणि कंपोस्टींग यंत्रासारख्या उपकरणांवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे. ट्रॅक्टरच्या सुट्या भागांवर पूर्वी १८ टक्के कर होता. तो आता ५ टक्के झाला आहे. यामुळे या वस्तू शेकऱ्यांच्या आवाक्यात येतील आणि कृषी उत्पादन वाढीला प्रोत्साहन मिळेल अशी अपेक्षा आहे.)*

जीएसटीचे नवीन दर येत्या सोमवारपासून लागू होणार आहेत.

**<><><><>**

श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवाला राज्यातल्या प्रमुख महोत्सवाचा प्रतिष्ठेचा दर्जा बहाल करण्यात आला असल्याची माहिती पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी आज मुंबईत दिली. येत्या २२ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबरपर्यंत सुरु राहणार असलेल्या या महोत्सवादरम्यान स्थानिक लोककला, गोंधळी गीतं, भारुडं, जाखडी नृत्य यांसारख्या पारंपरिक कला सादर केल्या जाणार असून भजन, कीर्तन, गोंधळ यांसारख्या धार्मिक-सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केल्या जाणार असल्याचंही देसाई यांनी सांगितलं.

**<><><><>**

कोल्हापूरचा शाही दसरा महोत्सव आता राज्याच्या प्रमुख महोत्सवांच्या यादीत समाविष्ट झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागानं या महोत्सवाला अधिकृत मान्यता दिली आहे. या दसरा महोत्सवादरम्यान स्थानिक लोककला, लोकनृत्यं, शिवकालीन शस्त्र प्रदर्शन तसंच शिवकालीन युद्धकलांच्या सादरीकरणासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यातल्या सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये एक उद्यान विकसित करण्यात येणार असून या उद्यानांना नमो उद्यान असं नाव देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. प्रत्येक उद्यानासाठी १ कोटी रुपयांचा निधीही देण्यात येणार आहे. नव्याने विकसित झालेल्या या उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा

आयोजित करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून प्रत्येक विभागातून ३ नगरपरिषद आणि नगरपंचायतींना बक्षिसं दिली जातील.

महसूल आणि वन विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवडा' हे विशेष अभियान राबवणार आहे. उच्च आणि तंत्र शिक्षण विभागामार्फत राज्यातली सर्व विद्यापीठं आणि महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन होईल. कौशल्य विकास विभाग राज्यातल्या साडे सातशे गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवणार आहे. राज्यातल्या ४१९ शासकीय औद्योगिक संस्थांमधून हजारो विद्यार्थी एकत्र येऊन हे अभियान राबवतील. भाजपाकडून आयोजित सेवा पंधरवड्यात १ लाख मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, नेत्र तपासणी, रुग्णांना चष्मे वाटप, मोदी विकास मॅरेथॉन, क्रीडा स्पर्धा असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

**<><><><>**

सेवा आणि सुशासन या तत्वांचं अनुसरण करीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रसरकारने अनेक योजना राबवल्या आहेत. हरित आणि स्वच्छ उर्जेच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय सौर आघाडीद्वारे भारताला सौर उर्जा क्षेत्रात महत्त्वाचं स्थान मिळण्यासाठी केलेल्या कामगिरीचा थोडक्यात आढावा आपण घेणार आहोत….

- **- होल्ड.. कॅप्सूल - -**

*(हवामान बदलांवरच्या उपायांना पाठिंबा देण्यापासून ते हरित उर्जेपर्यंत भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा घडवून आणली आहे. नोव्हेंबर २०१५ मध्ये प्रधानमंत्री मोदी आणि फ्रान्सचे तत्कालीन अध्यक्ष फ्रँकोइस ओलांद यांनी आंतरराष्ट्रीय सौर करार केला होता. या आघाडीनुसार सौर उर्जा निर्मिती क्षेत्रात २०३०पर्यंत एक हजार डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक करण्याचं उद्दिष्ट आहे. आंतरराष्ट्रीय सौर आघाडी हा जगासाठी एक मोठा आशेचा किरण म्हणून उदयाला आल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री मोदी यांनी नवी दिल्ली इथे आंतरराष्ट्रीय सौर आघाडीच्या पहिल्या संमेलनाच्या उद्घाटनावेळी केलं होतं.*

- ***- होल्ड - बाईट  नरेंद्र मोदी - -***

*दक्षिण आशियापासून आफ्रिका आणि युरोपपर्यंतच्या देशांना सौर संसाधनाच्या माध्यमातून जोडणं आणि, अल्प विकसित देश आणि विकसनशील देशांची उर्जेची मागणी पुरवतानाच कार्बन उत्सर्जनाची मर्यादा कमी करण्याचा या आघाडीचा उद्देश आहे.)*

**<><><><>**

सत्तेत नसतानाही रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून शेकडो तरुणांना नोकरी मिळवून देत असल्याचा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. प्रदेश काँग्रेसने आज मुंबईत आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्याचं उद्घाटन करताना ते बोलत होते. या मेळाव्यात आयटी, विमा, बँकिंग अशा विविध क्षेत्रातल्या ७५ कंपन्या सहभागी झाल्या होत्या.

**<><><><>**

बंजारा समाजाला अनुसूचित जमाती आरक्षण मिळावं, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य बंजारा आरक्षण कृती समितीनं आजही राज्यात अनेक ठिकाणी आंदोलन केली.

**सोलापुरात** बंजारा समाजानं जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना मागण्यांचं निवेदन दिलं. **हिंगोली** जिल्ह्यात नांदेड-औरंगाबाद महामार्गावरील औंढा नागनाथ जिंतूर टी पॉईंट इथं आंदोलकांनी रास्ता रोको केला. **लातूर जिल्ह्यात** उदगीर उपजिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

**<><><><>**

मराठवाडा आणि कोकणात आज बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

**जालना** शहरासह जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीपिकांबरोबरच घरं आणि दुकानांमध्ये पाणी शिरल्यानं व्यापाऱ्यांचं नुकसान झालं आहे. पावसामुळे झालेल्या विविध दुर्घटनांत तिघाजणांचा मृत्यू झाला. बीड जिल्ह्यात पावसामुळे प्रचंड नुकसान झालं आहे.

**परभणी जिल्ह्या**त झालेल्या मुसळधार पावसामुळे येलदरी प्रकल्पाचे दहा दरवाजे उघडले असून पूर्णा नदीत पाण्याचा विसर्ग होत आहे.

**लातूर** जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे **तावरजा** मध्यम प्रकल्प पहिल्यांदाच भरला. अनेक वर्षानंतर पहिल्यादांच पाणी आल्यानं इथं जलपूजन करण्यात आलं.

**रत्नागिरी** जिल्ह्यातही सर्व तालुक्यांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे.

<><><><>

आकाशवाणी मुंबईच्या केंद्रीय विक्री विभागात आयोजित हिंदी पंधरवड्याचं उद्घाटन ज्येष्ठ गायक अनुप जलोटा यांच्या हस्ते झालं. हिंदीच्या प्रचार-प्रसारासाठी हा पंधरवडा उपयुक्त ठरणार असल्याचं ते यावेळी म्हणाले. यावेळी विभागातले अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

<><><><>

रत्नागिरी जिल्ह्यातल्या सर्व समुद्रकिनाऱ्यांवर कोणत्याही प्रकारची वाहनं चालवण्यावर जिल्हा पोलीस दलानं बंदी घातली आहे. दापोली तालुक्यात कर्दे इथं एका पर्यटकानं वाळूतून धोकादायक पद्धतीने वाहन चालवल्यामुळे दुर्घटना झाल्याच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आलं आहे.

<><><><>

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं २०२५-२६ या वर्षासाठी प्राप्तिकर विवरणपत्र भरण्याची मुदत आज एका दिवसानं वाढवली आहे. त्यामुळे आज मध्यरात्रीपर्यंत प्रप्तिकरविवरण पत्र भरता येतील. यंदाच्या करनिर्धारण वर्षासाठी आतापर्यंत सात कोटीहून अधिक प्राप्तिकर विवरणपत्र दाखल झाल्याचं कर विभागानं सांगितलं आहे.

<><><><>

रत्नागिरीच्या दापोली तालुक्यातल्या केळशी किनारा परिसरातून पोलिसांनी आज चार लाख रुपये किमतीचे  ९९८ किलो अमली पदार्थ जप्त केले. हे अमली पदार्थ अबार इस्माइल डायली नावाच्या एका  ३२ वर्षीय आरोपीच्या घरात साठवले होते.

<><><><>

गेल्या २४ तासांत मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार पाऊस पडला. कोकण,विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. आगामी २४ तासांत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><>//